महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/बैठक/२०२२/ ४८४ दिनांक : 13 JUN 2022

परिपत्रक (इमेलव्दारे)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदविका अभियांत्रिकी प्रवेशात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व स्टेक होल्डरच्या ऑनलाईन बैठकीबाबत...

संदर्भ : १. संचालनालयाचे आदेश क्र. १०/ एडीएम/सुविधा केंद्र/Post SSC/DSD/२०२२/४५२, दि.१.६.२०२२.

२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/ एनजीपी/ नोडल ऑफीसर/ पदविका/ २०२२/ ४५४, दि.१.६.२०२२.

३. संचालनालयाचे पत्र क्र. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२२/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका /४५५, दि. १.६.२०२२.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील तंत्रनिकेतनांद्वारे "स्कुल कनेक्ट" हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत दहावीच्या शाळेमध्ये तंत्रनिकेतनांचे व त्यांच्या विद्याशाखांचे सादरीकरण, प्रवेशाबद्दल मार्गदर्शन, जाहिराती, मुलाखती. प्रसिद्ध माजी विद्यार्थी / उद्योगजक यांचे मनोगत अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक परिपाक म्हणजे मागील सलग ३ वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश १० टक्क्यांनी वाढले आहेत. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ला असलेले ४० टक्के प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ७० टक्के झालेले आहेत. संस्थांनी राबविलेल्या सकारात्मक उपक्रमांमुळे हे शक्य झाले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दिनांक २ जुन, २०२२ पासून सुरु झालेली आहे. सदर प्रवेशप्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ वरील कार्यालयीन आदेशान्वये, इ.१० वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता सुविधा केंद्र (Facilitation Centre-FC) घोषित करण्यात आलेली आहेत. संचालनालयाच्या संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सुविधा केंद्रांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी जिल्हानिहाय नोडल अधिकारी (Nodal Officer) नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेशाचे वेळापत्रक संचालनालयाच्या संदर्भ क्र. ३ वरील पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता १०० टक्के प्रवेश करण्याचे ध्येय ठेवून या वर्षीची प्रवेश प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सदर उद्दीष्ट साध्य करण्यासाठी सर्व स्टेक होल्डरकडून नियोजनबध्द पध्दतीने प्रयत्न होणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाचे प्रतिनिधी, सर्व संस्थांचे प्राचार्य व प्रवेश प्रक्रियेतील संबंधित अधिकारी यांची ऑनलाईन पध्दतीने दि.१४/६/२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजता बैठक निम्नस्वाक्षरीकारांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. सदर बैठकीत प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सदर ऑनलाईन बैठकीत सर्व सहसंचालक, सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, संचालक व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई आणि उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, जिल्हयाचे नोडल अधिकारी, तसेच पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाचे प्रतिनिधी, सर्व प्राचार्य, सुविधा केंद्रांचे मुख्य समन्वयक यांनी सहभागी व्हावे. सर्व संबंधितानी बैठकीसाठीची लिंक संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. बैठकीपुर्वी संबंधितांनी शासनाने मान्यता दिलेल्या प्रवेश नियमांचा अभ्यास करावा. तसेच आजपर्यंत झालेल्या पदविका प्रवेशाच्या नोंदणीचा अहवाल तयार ठेवावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रतः माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावे व बैठकीसाठीची लिंक सहसंचालक, विभागीय कार्यालयांना ईमेलद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे, यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या स्तरावरुन आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच आयटी सेल, मुख्य कार्यालय यांच्याकडून प्राप्त होणारी बैठकीची लिंक सर्व संबधितांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व संबंधित बैठकीस हजर राहतील याची दक्षता घ्यावी.

३. मे. फोर पिलर्स इन्फोटेक इंडिया प्रा.लि., ए-१०१, कुमार श्वास, बाणेर पाषाण लिंक रोड, ओजस सोसायटी, पुणे यांनी सदर बैठकीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी, मनुष्यबळ व युजर मॅन्युअल इ. बाबींची व्यवस्था करावी.